


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २३१ वा शुक्रवार दि ०७ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# सावरगाव डुकरेत भीषण कौटुंबिक हत्याकांड!

## आई-वडिलांची हत्या करून मुलाने घेतला स्वत:चा जीव...

**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील सावरगाव डुकरे येथे ५ नोव्हेंबरच्या रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. स्वत:च्या आई-वडिलांची निर्घृण हत्या करून मुलाने आत्महत्या केल्याची माहिती समोर येत आहे. मृतांमध्ये सुभाष डीगंबर डुकरे (७५), त्यांची पत्नी लता डुकरे (६५) आणि मुलगा विशाल सुभाष डुकरे (४२) यांचा समावेश आहे. हे तिघेही सावरगाव डुकरेचे रहिवासी होते. ही घटना इतकी भयावह आहे



की गावकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नेमकं कोणत्या कारणावरून विशालने आई-वडिलांचा खून केला आणि त्यानंतर स्वत:चेही जीवन संपवलं, याचे कारण मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. कौटुंबिक वाद की मानसिक नैराश्य? यावर विविध चर्चांना उधाण आलं आहे.

घटनेची माहिती मिळताच चिखली पोलीस यंत्रणा आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली. घराला संपूर्णपणे सील करण्यात आले असून पंचनामा सुरू आहे. तिन्ही मृतदेहांना पोस्टमार्टेमसाठी जिल्हा उपरुग्णालय, चिखली येथे हलविण्यात आले आहे. ही घटना केवळ एक खून-आत्महत्या नसून समाजाच्या मानसिक आरोग्याच्या स्थितीवर मोठा प्रश्नचिन्ह उभा करणारी आहे. गावात शोककळा पसरली असून पोलिसांचा तपास सुरू आहे

# बुलढाण्यात गर्भहत्येच्या कचाट्यात पकडला डॉक्टर...

**जनसंचलन/बुलढाणा**



शहरात गर्भलिंग निदानासारख्या घृणास्पद आणि कायद्यानं बंदी घातलेल्या कृत्यात सहभागी असलेल्या डॉक्टरवर जिल्हा शल्य चिकित्सकांनी धडक कारवाई करत पडदा फाडला आहे. अवैध गर्भलिंग चाचणीबाबत सतत येत असलेल्या तक्रारींवर अखेर जिल्हा प्रशासन जागं झालं आणि धाड टाकताच संपूर्ण शहरात खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, एम.डी. नेचरोपॅथी डॉक्टर कैलास गवई यांना पोलिसांनी तत्काळ अटक केली. तार कॉलनी, सुंदरखेड येथे त्यांच्या राहत्या घरातच हे अवैध गर्भलिंग निदान केंद्र गुपचूप सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. जिवंत लेकराचा गळा घोटणाऱ्या या विकृत व्यवसायाचा अड्डा घराच्या चार भिंतीत तयार केला होता, हे सत्य समोर येताच नागरिकांत संताप उसळला आहे. महिला भ्रूणहत्येचा घातक खेळ रचणाऱ्या या डॉक्टरवर पोलिसांनी ताब्यात घेतले पुढील तपास वेगाने सुरू आहे. प्रशासनाच्या या कारवाईने अशा बेकायदेशीर रॅकेट्सना चपराक बसली असली, तरी आता कठोर शिक्षा आणि इतर अशा केंद्रांवर साखळी धाड हेच जनतेचे ठाम मागणे बनले आहे.

# भाजपावर विश्वासघात की पश्चात्ताप?

## अनंता शिंदेंचे आरोप व नंतर माफी राजकीय वादळाला तोंड!





**जनसंचलन/ बुलढाणा**

भाजपाला धक्का देत शिवसेना (शिंदे गटात) प्रवेश केलेले अनंता शिंदे आता त्यांच्या कृत्यामुळे बॅकफूटवर आले आहेत. राजकीय रंगमंचावर प्रवेश करताच त्यांनी माफीचा सूर लावला आहे. नुकत्याच व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये त्यांच्या गळ्यात भाजपाचा दुपट्टा दिसत होता, ज्यावर श्वेता महाले व पंतप्रधान नरेंद्र मोदींचे फोटो होते. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर भाजप कार्यकर्त्यांत संतापाची लाट उसळली. त्यावर अनंता शिंदे म्हणाले. मी भारतीय जनता पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांची व पदाधिकाऱ्यांची माफी मागतो. या प्रकरणात भाजपचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही. भाजप हा सच्च्या, एकनिष्ठ कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. जे माझ्यासोबत घडलं, ती वस्तुस्थिती मी मांडली. मात्र हा पश्चात्ताप की राजकीय नाटक, यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. पक्षांतर करून जनतेत सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न की दबावाखाली दिलेली माफी? भाजपाच्या नाराज कार्यकर्त्यांनी आता थेट प्रश्न विचारले.विश्वासघात करून पुन्हा माफी? हे जनतेला मान्य नाही! राजकारणातल्या या नाट्यमय कलाटणीने बुलडाणा शहरात राजकीय तापमान चढले असून आगामी दिवसात या प्रकरणावर आणखी खळबळ उडण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# आर्थिक समावेशन व बँक-मित्र....

## संपादकीय लेख

आजचे युग हे वित्तीय भांडवलाचे आहे. या पार्श्वभूमीवर जगभरातील सर्वच देशांनी आर्थिक समावेशकतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. या संकल्पनेमागील मूलभूत उद्दिष्ट असे होते, की प्रत्येक सज्ञान व्यक्तीचे बँकेत खाते असावे आणि त्या खात्यामार्फतच त्याचे सर्व आर्थिक व्यवहार पार पडावेत. विकसनशील; तसेच आर्थिक मागास देशांना हे अद्याप आवश्यक तेवढे साध्य करता आलेले नाही. भारतातील आर्थिक समावेशन चळवळीची सुरुवात १९६९मध्ये १४ मोठ्या खासगी बँकांच्या राष्ट्रीयीकरणामधून झाली. त्यानंतर, १९७५मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. यामागील प्रमुख उद्देश होता, ग्रामीण भागातील जनतेला बँकिंग व्यवस्थेत सामावून घेणे व त्यांना आर्थिक मुख्य प्रवाहात आणणे. यानंतर, १९८०मध्ये आणखी सहा खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून हीच प्रक्रिया पुढे नेण्यात आली. मात्र, उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष उपलब्धता यामध्ये मोठी दरी कायम होती. ही दरी भरून काढण्यासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेने २००५मध्ये ङ्गआर्थिक समावेशनफ हे धोरणात्मक उद्दिष्ट म्हणून स्वीकारले. त्या काळात देशातील केवळ ४० टक्के सज्ञान व्यक्तींचीच बँकेत खाती होती. देशभर बँकांच्या शाखा सर्वदूर उघडण्याची गरज होती; परंतु व्यवसायाची क्षमता, व्यवहार्यता आणि खर्च-अर्जनाचा मुद्दा लक्षात घेता, पारंपरिक शाखा उघडणे सर्वत्र शक्य नव्हते. यावर पर्याय शोधताना सन २००६मध्ये ङ्गबँकिंग करस्पॉन्डंटफ म्हणजेच ङ्गबँक मित्रफ ही संकल्पना उदयास आली. यामुळे बँकिंग व्यवस्थेच्या दारापर्यंत न पोहोचलेल्या लाखो लोकांना ङ्गदारे बँकेची-सेवा गावाचीफ हे ध्येय प्रत्यक्षात अनुभवता आले. २००९मध्ये डॉ. सी. रंगराजन समितीने आर्थिक समावेशन विषयावर एक सविस्तर अहवाल प्रसिद्ध केला. तथापि, त्याकाळी बहुतांश बँकर्स या प्रश्नाकडे फारसे गांभीर्याने पाहत नव्हते. मात्र, ऑगस्ट २०१४मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ङ्गप्रधानमंत्री जन-धन योजनाफ जाहीर केली आणि त्याद्वारे आर्थिक समावेशनाला राष्ट्रीय स्तरावर सर्वोच्च प्राथमिकता प्राप्त झाली. या योजनेच्या प्रभावामुळे गेल्या दहा वर्षांमध्ये भारताने आर्थिक समावेशनाच्या दिशेने लक्षणीय प्रगती केली आहे. आज भारतातील एकूण सज्ञान व्यक्तींमध्ये सुमारे ८० टक्के लोकांची बँक खाती उघडली गेली आहेत. सर्वप्रथम, सर्व नागरिकांची बँक खाती उघडण्यात आली. त्यानंतर ही खाती आधार क्रमांकाशी जोडली गेली. पुढे या खातेदारांना ङ्गरुपेफ डेबिट कार्ड देण्यात आले. त्यानंतर त्यांना ङ्गप्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनाफ व ङ्गप्रधानमंत्री जीवन सुरक्षा विमा योजनाफ या विमा योजनांचे वित्तीय संरक्षण देण्यात आले. या योजनांनंतर, वृद्धावस्थेत आधार मिळावा म्हणून ङ्गअटल पेन्शन योजनाफ लागू झाली. हे सगळे घडत असताना, कोअर बँकिंग सोल्युशनच्या (सीबीएस) माध्यमातून देशातील सर्व बँका एकमेकींशी जोडल्या गेल्या. त्यामुळे पेमेंट आणि सेटलमेंट यंत्रणा अधिक गतिमान आणि सुलभ झाली. या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजेच, भारताने आर्थिक समावेशनाच्या क्षेत्रात एक अद्वितीय प्रगती साधली. याचमुळे सरकारला ङ्गडायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फरफ(डीबीटी) या यंत्रणेद्वारे अनुदान, शिष्यवृत्ती, आर्थिक मदत इत्यादी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पोहोचवणे शक्य झाले. या आर्थिक समावेशनाच्या प्रवासात ङ्ग बँक-मित्र म हे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणारे घटक आहेत. संपूर्ण योजनेचा भार त्यांच्या खांद्यावर आहे; कारण तेच प्रत्यक्षात गावोगावी जाऊन नागरिकांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचवत आहेत. मात्र, हेच बँक-मित्र आज सर्वार्थाने दुर्लक्षित राहिले आहेत आणि हेच ते मुख्य कारण आहे, की गेल्या दोन वर्षांत बँक-मित्रांची संख्या ८,६२,६७९ एवढी घटली आहे. ही घसरण हे स्पष्टपणे दर्शवते, की आर्थिक समावेशनाची ही योजना आता उलट्या दिशेने प्रवास करत आहे. त्याचा अर्थ असा, की ६७ टक्के भागांतील जनतेला ज्या बँकिंग सेवा आपल्या गावात, अगदी आपल्या दारात मिळत होत्या, त्या सेवा आता बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. योजना तर चालू आहे; पण बँक-मित्र टिकून न राहिल्यास ही संकल्पनाच अपूर्ण ठरेल. बँक-मित्रांच्या उत्पन्नाची हमी नाही, सामाजिक सुरक्षितता नाही, कामाचे निश्चित तास नाहीत, प्रशिक्षण व मान्यता व्यवस्थेचा अभाव आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बँका स्वतः बँक-मित्रांची नेमणूक कंत्राटी पद्धतीने करत होत्या. आता, बहुतेक बँका या नेमणुका मध्यस्थ कंपन्यांच्या माध्यमातून करतात. ज्या ठिकाणी एका बँक-मित्राला पुरेसे उत्पन्न मिळत नाही, तेथे चार-चार बँक-मित्रांची नेमणूक केली जात आहे. या नेमणुकांची प्रक्रिया, कमिशनचे निकष, कामाचे स्वरूप आदी कुठल्याच बाबतीत ठोस निश्चिती अथवा सुसूत्रता नाही. त्यांना ना सेवेत सुरक्षितता आहे, ना निश्चित कामाचे तास, ना रजा, ना वैद्यकीय सुविधा, ना इतर कोणत्याही सवलती. ही समस्या केवळ बँक-मित्रांचीच नाही, तर संपूर्ण आर्थिक समावेश योजनेच्या यशासाठी एक गंभीर अडथळा बनली आहे. या गंभीर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सरकारने सर्व संबंधित घटक - केंद्र सरकार, बँकर्स, रिझर्व्ह बँक, राज्य अग्रणी बँका, नाबार्ड, बँक-मित्र संघटना आणि राज्य सरकार यांना एकत्र घेऊन दीर्घकालीन व ठोस उपाययोजना आखाव्यात. बँक आणि बँक-मित्र यांच्यामधील मध्यस्थ संस्थांना बाजूला सारणे, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रक्रिया निश्चित करणे, बँक-मित्रांची भूमिका, कार्यक्षेत्र व जबाबदाऱ्या स्पष्टपणे ठरवणे, त्यांच्या कमिशनमध्ये लक्षणीय सुधारणा करणे, त्यांना सेवा सुरक्षितता व सामाजिक संरक्षण देणे, या सगळ्या गोष्टी अत्यावश्यक आहेत. अशा व्यापक आणि समन्वित प्रयत्नांतूनच आर्थिक समावेशनाला योग्य दिशा मिळू शकते आणि बँक-मित्रांच्या खऱ्या योगदानाला मान्यता आणि स्थैर्य प्राप्त होऊ शकते. वाढत्या सायबर फसवणुकीच्या घटनांचा विचार करता, नागरिकांना सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल व्यवहार शिकवणे अत्यावश्यक झाले आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती आणि साक्षरता मोहिमा राबविणे काळाची गरज आहे आणि त्या पुढाकाराचे नेतृत्व बँक-मित्र करू शकतात. या साऱ्या प्रक्रियेमधून भारतीय जनतेसाठी ङ्गबँकिंग सेवाफ हा एक मूलभूत हक्क बनला पाहिजे. त्यात केवळ बँक खाते उघडणेच नव्हे, तर गरजेनुसार कर्जाची सुलभ उपलब्धताही अंतर्भूत असली पाहिजे. भारताला जर खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकास घडवून आणायचा असेल, तर ही भूमिका आणि हे उद्दिष्ट हीच सर्वोच्च प्राथमिकता ठरली पाहिजे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# तेजस्वी यादवांचा 'केजरीवाल' करण्याची तयारी; 'मिशन नंदिग्राम'वाला मोदी-शहांचा शिलेदार ॲक्टिव्ह..

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान आज होत आहे. अनेक मंत्र्यांसह दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. दुसरीकडे भाजपनं महागठबंधनचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार आणि लालू प्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांच्या विरोधात जोरदार फिल्डींग लावली आहे. तेजस्वी यादव यांच्या पराभवासाठी भाजपनं पूर्ण ताकद पणाला लावली आहे.तेजस्वी यादव राघौपूर मतदारसंघातून सलग तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. मागी निवडणुकीत त्यांनी भाजपच्या सतीश कुमार यादव यांचा पराभव केला होता. तेजस्वी यादव यांना ९७ हजार ४०४ मतं मिळाली होती. तर सतीश कुमार यादव यांना ५९ हजार २३० मतं घेतली होती. तेजस्वी यादव ३८ हजार १७४ मतांनी विजयी झाले. इकडे भाजपनं पाच दिवसांपूर्वी मोठी खेळी करत गेल्या निवडणुकीत २४ हजार ९४७ मतं घेणाऱ्या लोक जनशक्ती पक्षाच्या राकेश रोशन यांचा पक्षप्रवेश घडवून आणला. त्यामुळे राघौपूरमध्ये भाजपची ताकद वाढली आहे.तेजस्वी यादव महागठबंधनचे मुख्यमंत्रिदाचे उमेदवार आहेत. पण भाजपनं त्यांना त्यांच्याच मतदारसंघात अडकून ठेवलं. राघौपूरमध्ये आज मतदान होत आहे. गेल्या काही दिवसांपासून तेजस्वी जवळपास रोजच संध्याकाळी मतदारसंघात फिरत होते. लोकांच्या गाठीभेटी घेत होते. तेजस्वी यांना त्यांच्याच मतदारसंघात अडकवून ठेवण्याची भाजपची खेळी बऱ्याच प्रमाणात यशस्वी ठरली आहे.२०२१ मध्ये भाजप नं नंदिग्राममध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि याच वर्षी दिल्लीत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव घडवून आणला. दोन्ही नेते त्यांच्या पक्षांचे प्रमुख आहेत. सत्ता आल्यास तेच मुख्यमंत्री होणार ही गोष्ट निश्चित होती. भाजपनं याच नेत्यांभोवती फिल्डींग लावत त्यांचा पराभव केला. आताही त्याच पॅटर्नची पुनरावृत्ती भाजप बिहारमध्ये करण्याच्या तयारीत आहे.२०२१ मध्ये पश्चिम बंगालमध्ये



विधानसभा निवडणूक झाली. त्याची जबाबदारी भाजपनं धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे सोपवली होती. आता त्याच प्रधानांकडे भाजपनं बिहार मोहिमेचं नेतृत्व दिलं आहे. प्रधान यांनीच व्यूहनिती आखत नंदिग्राम मतदारसंघात ममता बॅनर्जी यांचा पराभव घडवला होता. सुवेंदु अधिकारी यांनी बॅनर्जी यांना पराजयाचा धक्का दिला होता. आता प्रधान यांनी राघौपूरमध्ये लक्ष घातलं आहे. अमित शहांचे निकटवर्तीय असलेल्या प्रधान यांनी राघौपूरमध्ये जातीनं लक्ष घातलं. त्यामुळे लालू प्रसाद यांच्या कुटुंबाला राघौपूरमध्ये प्रचार करावा लागला. सुरक्षित बालेकिल्ल्यात राष्ट्रीय जनता दलाला नेत्यांची पूर्ण फौज उतरवावी लागली.याच वर्षी झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचे संयोजक आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला. भाजपच्या परवेश वर्मा यांनी ४ हजार मतांनी केजरीवालांना पराजयाचा धक्का दिला. २०१३ पासून केजरीवाल नवी दिल्ली मतदारसंघातून निवडून येते. पण भाजपनं अचूक फिल्डींग लावून त्यांचा करेक्ट कार्यक्रम केला. आता तेजस्वी यादव यांचा केजरीवाल करण्याची तयारी भाजपनं सुरु केली आहे.

राघौपूरमध्ये यादव प्लस मुस्लिम या समीकरणावर यादव कुटुंबानं १९९५ वर्चस्व राखलं. २०१० चा अपवाद सोडल्यास या मतदारसंघात यादव कुटुंबातील सदस्यच निवडून येत आले आहेत. आता भाजपनं यादव उमेदवार देत त्या समाजाच्या मतांचं विभाजन होईल अशी सोय केली आहे. यादव मतांचं विभाजन, सोबत ईबीसी, ओबीसी यांची मतं असं समीकरण भाजपनं मांडलं आहे. यादव कुटुंबाचा बालेकिल्ला भेदण्यात भाजपला यश आल्यास त्याचे राजदवर दिर्घकालीन परिणाम होऊ शकतात.

## बिहार राज्यामध्ये ६० टक्के मतदान

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात मतदारांनी आपला हक्क बजावण्यात मोठा उत्साह दाखवला असून, सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ६०.१३ टक्के मतदान झाले. लोकशाहीच्या या उत्सवात राज्यातील ३ कोटी ७५ लाख मतदारांनी १३१४ उमेदवारांचे भवितव्य निश्चित केले आहे. सर्वाधिक मतदान बेगुसराय जिल्ह्यात नोंदवले गेले.

१८ जिल्ह्यांमधील १२१ जागांवर शांततापूर्ण वातावरणात मतदान प्रक्रिया पार पाडली. सर्व बूथवर प्रथमच वेबकास्टिंगची व्यवस्था करण्यात आली होती, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवणे शक्य झाले. मतदानाची वाढती टक्केवारी लोकशाहीवरील लोकांचा विश्वास दर्शवते. दरम्यान, दुपारी ३ वाजेपर्यंत एकूण ५३.७७ टक्के मतदान झाले होते, ज्यात बेगुसराय (५९.८२ टक्के) आघाडीवर होते, तर पाटणा (४८.६९ टक्के) मध्ये सर्वात कमी मतदान झाले. सकाळी ११ वाजेपर्यंत सरासरी २७.६५ टक्के मतदान झाले होते, त्यावेळीही बेगुसरायमध्ये (३०.३७ टक्के) सर्वाधिक आणि पाटणा (२३.७१ टक्के) मध्ये सर्वात कमी मतदानाची नोंद झाली. या टप्प्यात उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) मधील अनेक मंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी यादव (राघोपूर) यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचे राजकीय भवितव्य इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनमध्ये (ईव्हीएम) कैद झाले आहे.

## कुल- मोहोळ यांची जोडी उभी करण्यामागे भाजपची रणनीती काय?

**बारामती :** भाजपबरोबर अजितदादा सत्तेत सहभागी झाले, मात्र भाजपचा जुना स्वभाव पुन्हा एकदा बारामतीला पाहायला मिळणार आहे. बारामतीत नगरपरिषदेच्या निवडणूकीपासून ते जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूकीपर्यंतचा विचार करत भाजपने आपले सत्तेतले बाहुबल वाढविण्यासाठी व अजित दादावर अंकुश ठेवण्यासाठी मुरलीधर मोहोळ नावाचे अस्त्र बाहेर काढले आहे.भलेही राज्यात भाजप व अजित पवारांची राष्ट्रवादी सत्तेत असली तरी बारामतीच्या राजकारणात मात्र या दोस्तीत कुस्ती होण्याची शक्यता आहे. भाजपने काल एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातही आपला प्रभारी नेमला, त्या पाठोपाठ अजित पवारांच्या बालेकिल्ल्यातही तगडे नेते देऊन आपल्या कार्यकर्त्यांना दिलासा दिला आहे.दुसरीकडे, अजित पवारांना आताच नुकतेच महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणूकीने घायकुतीला आणलेल्या मुरलीधर मोहोळ यांच्याकडे बारामतीचे प्रभारी व अजित पवारांचे पुर्वीचे कार्यकर्ते मात्र आता भाजपच्या गळ्यातील ताईत असलेले राहूल कुल यांची बारामतीच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.एकंदरीत राहूल कुल यांच्या दौंड तालुक्यात भाजपमधील काही प्रमुख नेते अजित पवारांच्या पक्षात काही दिवसांपूर्वीच प्रवेश




करते झाल्यानंतर दुखावलेल्या राहूल कुल यांच्या माध्यमातून भाजप अजित पवारांवर नथीतून तीर मारण्याच्या तयारीत आहे. राहूल कुल यांना ताकद देत बारामतीतील नाराजांना भाजपमध्ये घेण्यासाठी भाजपने या दोघांची निवड केली आहे. अजित पवार महायुतीत सहभागी झाल्यानंतर त्यांना अगोदर विरोध करणारे भाजपचे स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी गलितगात्र झाले आहेत.मरगळ आलेल्या संघटनेला पुन्हा उभारी देण्यासाठी भाजपने हा नवा खेळ खेळला आहे. भाजपच्या या व्यूहनितीत जुने सहकारी पुन्हा तग धरणार का आणि नवे सहकारी भाजपकडे येणार का हे येणारा काळ सांगेल.

# 'पार्थ पवारांचा विषयच येत नाही', वादग्रस्त जमीन प्रकरणावर सुप्रिया सुळे नेमकं काय म्हणाल्या?

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या मालकीच्या कंपनीने पुण्यातील हायप्रोफाईल कोरेगाव आयटी पार्क परिसरातील १८०० कोटी किंमतीची सरकारी जमीन अवघ्या ३०० कोटीत खरेदी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी संबंधित तहसीलदार आणि तलाटींवर कारवाई केली आहे. पण या कारवाईवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

एकीकडे २१ कोटींची स्टॅम्प ड्युटी, मागणी आज येते ६ कोटी. सरकार चालवतंय कोण आणि निर्णय प्रक्रिया कोण घेतंय?', असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.मुख्यमंत्र्यांनी आज आदेश दिले आहेत की, अचानक या



गोष्टी कशा होत आहेत. तो व्यवहार झालाय की नाही झालाय? स्टॅम्प ड्युटी भरलीय की नाही? सकाळी २१ कोटी होती आता ६ कोटी झालीय. मग जमीन सरकारची होती तर ती विकलीच कशी गेली? तलाटी आणि तहसीलदार म्हणतात आम्ही सहीच केली नाही. मग नक्की झालं तरी काय? याचं स्पष्टीकरण सरकारने दिलं पाहिजे', अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली. 'मला महाराष्ट्र सरकारचं आश्चर्य वाटत आहे की, रोज या सरकारचे काही ना काही गोंधळ येत असतात', असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.अजित पवारांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी अनेकांकडून केली जात आहे. मागणी करणारे काहीही मागणी करु शकतात. तो त्यांचा अधिकार आहे. आम्ही लोकशाहीवर प्रेम करणारे आणि विश्वास ठेवणारे लोकं आहोत. लोकशाहीत प्रत्येकाला मागणी करायचा अधिकार आहे.

आमच्यावेळीसही अनेकांनी राजीनामे मागितले. तो त्यांचा अधिकार आहे', अशी भूमिका सुप्रिया सुळे यांनी मांडली.मुख्यमंत्र्यांनी जे कमेंट्स केले आहेत त्यांनी उत्तरे दिली पाहिजेत. तहसीलदार, तलाटी म्हणतात आम्ही सहीच केली नाही. मग त्यांना काढून कसं टाकलं. हा कुठला न्याय आहे?', असाही सवाल त्यांनी केला.

'पार्थ पवारांचा विषयच येत नाही. हा महाराष्ट्र सरकारचा इंटरनल विषय आहे. याचं कारण असं आहे की, पार्थ पवारांना जे प्रश्न पाठवले त्यावर ते म्हणाले की, माझी लिगल टीम त्यावर उत्तर देईल. ते बरोबर आहे. पण दुसरीकडे महाराष्ट्र सरकार आपल्याला संभ्रमात टाकत आहे. महाराष्ट्र सरकार आधी म्हणतं की, जमिनीचा व्यवहार होऊ शकत नाही. व्यवहार होऊ शकत नाही तर मग स्टॅम्प ड्युटीची नोटीस कशी आली? स्टॅम्प ड्यूटी किती? त्याच्यातही तफावत आहे. तहसीलदाराला तुम्ही का काढलंत? कारण तहसीलदार म्हणतोय मी नाहीच सही केली. गोलमाल हैं भाई. दाल में कुछ बडा काला आहे. हे सगळं महाराष्ट्र सरकारची जबाबदारी आहे', अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

# जरांगेंच्या हत्येचा कट उघड!

## अडीच कोटींची सुपारी; दोन जण ताब्यात

**बीड:** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा एक कट रचल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, जरांगे पाटलांच्या हत्येसाठी अडीच कोटी रुपयांची सुपारी देण्यात आली होती. या प्रकरणी जालना पोलिस अधीक्षकांकडे जरांगे पाटलांचे सहकारी गंगाधर काळकुटे यांनी तक्रार दिल्यानंतर, स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने कारवाई केली आणि बीड जिल्ह्यातून दोन संशयितांना ताब्यात घेतले.

दोन्ही संशयितांचे नावे समोर आलेली नव्हती. मात्र यातील एक जरांगे यांचा पूर्वीचा सहकारी असल्याचे सम ोर आले असून, या दोघांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे. पोलिसांच्या तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, बीड शहरात काही दिवसांपूर्वी जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचण्यासाठी गुप्त बैठकाही घेण्यात आल्या होत्या. या बैठकीत जरांगे पाटलांच्या ओळखीतील काही जण उपस्थित होते. या बैठकीदरम्यान हत्येसाठी अडीच कोटी रुपयांची डील ठरल्याची चर्चा आहे. ही माहिती मिळताच गंगाधर काळकुटे यांनी पोलिसांकडे निवेदन देऊन तक्रार केली. तक्रार मि ळाल्यानंतर पोलिसांनी मध्यरात्री बीडमध्ये छापा मारून दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत आरोपींनी एका मोठ्या राजकीय नेत्याचे नाव घेतल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. मात्र, पोलिसांनी अधिकृतरीत्या कोणतेही नाव जाहीर केलेले नाही.

### जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ

पोलिसांनी या कटाचा पर्दाफाश केल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. जर वेळेवर कारवाई झाली नसती, तर गंभीर घटना घडली असती, असे पोलिस सूत्रांचे म्हणणे आहे. सध्या जरांगे पाटील यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून, त्यांना अतिरिक्त पोलिस संरक्षण देण्यात आले आहे. राज्यातील राजकीय वातावरणात या प्रकरणामुळे चांगलीच खळबळ उडाली आहे. विरोधी पक्षांनी यावर सरकारकडे सुरक्षेच्या त्रुटींवर प्रश्न उपस्थित केले आहेत, तर सरकारने या कटामागील सर्व दोषींना कठोर शिक्षा होईल, असा विश्वास दिला आहे.



## रामटेकमधील तलावात चौघे बुडाले

**नागपूर :** जिल्ह्यातील पारशिवनी व रामटेकमधील तलावांत मामा-भाचीसह चौघे बुडाले. सेल्फीच्या मोहात दोन विद्यार्थी भागीमहारी तलावात तर पोहणे शिकताना मामा-भाचीचा जयपालेश्वर तलावात बुडून मृत्यू झाला.

या घटनेने खळबळ उडाली असून तलावातील सुरक्षेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.अविनाश आनंद (वय २०, मूळ रा. बिहार), संकल्प सुनील माळवे (वय १९, मूळ रा. चंद्रपूर), हर्षिता विनोद माकडे (वय १३, रा. शिवाजी वॉर्ड, रामटेक) व तिचे मामा अजय वामनराव लोहबरे (वय ३२, रा. खात) अशी मृतकांची नावे आहेत. अविनाश हा प्रियदर्शिनी कॉलेजमध्ये अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षाला, संकल्प सेंट पॉल स्कूलमध्ये बारावीत तर हर्षिता ही रामटेक मधील आदर्श शाळेत नववीत शिकत होती. रामटेक तालुक्यातील डोंगरी येथील जयपालेश्वर तलावात घडली.

## सोन्याच्या बांगड्या देऊन हाती पडले सफरचंद, महिलेची फसवणूक



**मुंबई :** रुपयाच्या नाण्याला सुगंध येतो, असे कुणी तुम्हाला सांगितले तर त्यावर विश्वास ठेवाल? नाही ना! नागपाडा येथील वृद्ध महिलेने विश्वास ठेवला आणि हो नाण्याला खरेच सुगंध येत होता. या महिलेचा विश्वास बसल्याचे लक्षात येताच या वृद्धेकडून घरातील समस्या दूर करण्यासाठी हातातील बांगड्या घेण्यात आल्या. घरी जाऊन या बांगड्या पाण्यात ठेवून ते पाणी प्या, असे सांगून बांगड्या कागदामध्ये बांधून देण्यात आल्या. महिलेने पाण्यात बांगड्या टाकण्यासाठी कागद उघडला असता आतमध्ये पाच तोळ्यांच्या बांगड्याऐवजी सफरचंद आढळले.

नागपाडा येथील मोहम्मदी बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या ६० वर्षीय फातिमा (बदललेले नाव) या २ नोव्हेंबर रोजी सुरती मोहल्ला येथील बाजारात पायी चालत होत्या. रस्त्यात त्यांना एक तरुण भेटला. त्याने फातिमा यांना पत्ता विचारला. पत्ता आणि त्याठिकाणी कसे जायचे, हे सांगितल्यानंतर या तरुणाने फातिमा यांच्याकडे एक रुपयाचा सिक्का मागितला. एक रुपयाला सुगंध येत नाही, असे म्हणत या तरुणाने हातचलाखी केली आणि नंतर या सिक्क्याला खरेच सुगंध येऊ लागला. फातिमा अचंबित होऊन या तरुणाकडे बघू लागल्या. 'आजी तुम्ही काळजीत दिसताय, घरी काही टेन्शन आहे का?,' अशी आपुलकीने या तरुणाने विचारणा केली. आपलेपणाने कुणी विचारत असल्याने फातिमा सर्व काही सांगू लागल्या.मी तुम्हाला उपाय देतो म्हणत त्याने हातामधील सर्व बांगड्या त्यांना काढण्यास लावल्या. खिशातून एक कागद काढत या चारही बांगड्या या तरुणाने त्यामध्ये बांधत असल्याचे फातिमा यांना भासविले. कागदात बांधलेल्या बांगड्यांवर काळा दोरा गुंडाळत, काहीतरी करीत असल्याचे दाखवत तो कागद पुन्हा फातिमा यांच्या हातामध्ये दिला.

घरी जाऊन हा कागद उघडून आतील बांगड्या साध्या पाण्यात ठेवा. हे पाणी स्वतः प्या आणि घरातील सर्व सदस्यांना प्यायला द्या, सर्व तुमच्यासोबत नीट वागतील, असे सांगून हा तरुण तेथून गायब झाला.घरी जाऊन फातिमा यांनी पर्समधून कागदामध्ये बांधलेल्या बांगड्या काढल्या. काळा दोरा सोडून कागद उघडला असता आतमध्ये पाच लाखांच्या बांगड्याऐवजी एक सफरचंद सापडले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फातिमा यांनी हा प्रकार घरी सांगितला. त्यानंतर याबाबत नागपाडा पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली.

## नायलॉन मांजा गळ्यात अडकून शेतकऱ्याचा मृत्यू

वर्धा : वर्धा जिल्ह्यातील देवळी तालुक्यातील भिडी गावाजवळ नायलॉन मांजाने पुन्हा एकदा एका निरपराध व्यक्तीचा बळी घेतला आहे. सुभाष शेलोटे (वय ५०) हा शेतकरी आपल्या शेतातील फवारणीचे काम आटोपून दुचाकीने घरी परतत असताना पतंग खेळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे गळ्याला फास लागून जागेवरच त्यांचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना मंगळवारी ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास सहा वाजताच्या दरम्यान घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, सुभाष शेलोटे हे बाईक क्र. एम.एच. ३२ ए.जी. ४३१५ या क्रमांकाच्या दुचाकीवरून भिडी जवळील पूलाजवळून जात होते. त्याचवेळी रस्त्यावरुन ओलांडून गेलेल्या नायलॉन मांजाने अचानक त्यांच्या गळ्याला फास बसला. मांजा अतिशय धारदार आणि मजबूत असल्याने त्यांचा गळा चिरला गेला. रक्तस्राव होऊन ते दुचाकीवरून खाली पडले. गळ्यावरील गंभीर जखमेनं काही क्षणातच त्यांचा जागेवर मृत्यू झाला. उपस्थितांनी बघतात स्थानिक नागरिकांनी धाव घेतली. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.या घटनेमुळे भिडी परिसरात शोककळा पसरली आहे. नायलॉन मांजावर शासनानं स्पष्ट बंदी घातलेली असतानाही अशा प्राणघातक म ांजाचे धागे बाजारात कसे उपलब्ध होतात? याबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. नायलॉन मांजामुळे दरवर्षी अनेक निरपराध जीव गमवावे लागत आहेत. भिडी येथील या हृदयद्रावक घटनेमुळे पुन्हा एकदा नायलॉन मांजा बंदीची अंमलबजावणी किती प्रभावी आहे, हा प्रश्न समोर आला आहे.

## तिघांचा मृत्यू, अपघात नेमका कसा घडला? रेल्वे प्रशासनाकडून समोर आली अधिकृत माहिती

**मुंबई :** मध्य रेल्वे मार्गावर आज सँन्डहर्स्ट रोड रेल्वे स्थानकाजवळ दुर्दैवी घटना घडली आहे. रेल्वे वाहतूक खोळंबल्याम ुळे काही प्रवाशांनी रेल्वे ट्रॅकवरुन मार्ग काढण्याचा निर्धार केला. पण त्यांचा हा निर्णय जीवावर बेतला आहे. कारण संध्याकाळची वेळ होती. अंधार पडला होता. ठप्प झालेली रेल्वे वाहतूक सुरु करण्यात आली होती. पण त्यांना त्याबाबत माहिती नव्हतं. अचानक एक भरधाव फास्ट लोकल ट्रेन आली आणि तीन ते चार प्रवाशांना या लोकल ट्रेनने धडक दिली. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर आता मध्य रेल्वे प्रशासनाकडून अधिकृतपणे या घटनेची माहिती देण्यात आली आहे.




मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील निला यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली.आतापर्यंत जी माहिती मि ळाली आहे, त्या माहितीनुसार, सँन्डहर्स्ट रोड स्थानकापासून कल्याणच्या दिशेला तीन व्यक्ती हे रेल्वे रुळावरुन चालत होते. या दरम्यान पाठीमागून एक लोकल ट्रेन आली. यामुळे या लोकांना मार बसला. या तीनही व्यक्तींना हॉस्पिटलला नेलं आहे. या व्यक्तींवर औषधोपचार पोहोचवण्याचा प्रयत्न आपण सध्या करतो आहोत', असं जनसंपर्क अधिकारी म्हणाले.आपण वारंवार प्रवाशांना विनंती करत असतो की, कृपया रेल्वे ट्रॅक पास करु नका.

आतादेखील आम्ही विनंती करतो की, कृपया आपण रेल्वे ट्रॅक क्रॉस करु नये. या घटनेमागे काय कारणे होती, जखमी प्रवासी होते की बाहेरची व्यक्ती होती याची माहिती मिळेल. त्यानंतरच बोलू शकू', अशी प्रतिक्रिया मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील निला यांनी दिली.ट्रॅकवरुन गाडी जाते त्यावेळेस गाडीचा वेग खूप जास्त असतो. त्याम ुळे त्याची रिॲक्शन टाईम कमी वेळात थांबवणं किंवा अंधारात थांबवणं शक्य नसतं. त्यामुळे आपण प्रवासी आणि आजूबाजूच्या रहिवाशांना ट्रॅक पास करु नका किंवा ट्रॅकवरुन चालू नका, असं आवहन करत असतो. आपण वारंवार प्रवाशांना विनंती करतो की, ट्रॅकवर चालू नये. त्यामुळे इजा पोहोचू शकते', अशीदेखील प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# गोल्ड कोस्टमध्ये भारताचा 'सुंदर' बोलबाला

## कांगारूंचा ४८ धावांनी पराभव..




**गोल्ड कोस्ट :** गोल्ड कोस्टमधील कॅरारा ओव्हलवर आज भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील चौथा सामना खेळला गेला. या सामन्यात भारतीय गोलंदाजांनी धावांचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रेलिया संघाला १८.२ ओव्हरमध्ये सर्वबाद ११९ धावांवर रोखले. परिणामी भारताने ऑस्ट्रेलियाला ४८ धावांनी पराभूत केले. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने शानदार गोलंदाजी करत सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. या विजयासह भारताने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली.

चौथ्या टी २० सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. तर भारत प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरला होता. भारताने प्रथम फलंदाजी करत ऑस्ट्रेलियासमोर १६८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारताकडून कर्णधार शुभमन गिलने सर्वाधिक ४६ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलिया धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला. त्यांची सुरवात शानदार झाली नाही. ५ व्या ओव्हरमध्ये ऑस्ट्रेलियाला ३७ धावांवर मॅथ्यू शॉर्टच्या रूपात पहिला झटका बसला. त्याला २५ धावांवर अक्षर पटेलने माघारी पाठवले. त्यानंतर मात्र ऑस्ट्रेलियाच्या विकेट्स जात राहिल्या. ऑस्ट्रेलियाकडून केवळ शॉन मार्शने सर्वाधिक ३० धावा केल्या. इतर फलंदाज मात्र मैदानावर टिकू शकले नाहीत. मिशेल मार्श ३० धावा, जोश इंग्लिस १२ धावा, टिम डेव्हिड १४ धावा, जोश फिलिप १० धावा, मार्कस स्टोइनिस १७ धावा, ग्लेन मॅक्सवेल २ धावा, बेन द्वारशीस ५, झेवियर बार्टलेट ० धावा, ॲडम झांपा ० धावा करून बाद जाहले तर नॅथन एलिस २ धावांवर नाबाद राहिला. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने १.२ ओव्हरमध्ये केवळ ३ धावा देत सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. तर शिवम दुबे आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तर अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

## बुमराहच्या यॉर्करने पाकिस्तानी दिग्गजाचा विक्रम उद्ध्वस्त!

**नवी दिल्ली :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील चौथा सामना आज खेळवण्यात आला. या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा ४८ धावांनी परभव केला. हा सामाना गोल्ड कोस्टमधील कॅरारा ओव्हलवर खेळला गेला. या सामन्यात जसप्रीत बुमराहने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या इतिहास रचला आहे. बूमराहने माजी पाकिस्तानी फिरकी गोलंदाज सईद अजमलचा विक्रम मोडून एक महत्वाच्या टप्प्याला गवसणी घातली आहे. या सामन्यापूर्वी बुमराहने ऑस्ट्रेलियाविरुद्ध १६ डावात १८ बळी टिपले होते, तर ११ डावात १९ बळी घेणाऱ्या सईद अजमलची बरोबरी साधली आहे.




चौथ्या सामन्यात एक बळी घेत बुमराह ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० सामन्यात सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज बनला आहे. पाकिस्तानचा मोहम्मद अमीर १७ डावात १० बळींसह यादीत तिसऱ्या स्थानी विराजमान आहे. न्यूझीलंडचा मिचेल सँटनर १२ डावात १७ बळींसह चौथ्या स्थानावर आहे.

## क्रिस्टियानो रोनाल्डो निवृत्त होणार?

**पुणे :** फुटबॉलप्रेमींसाठी एक निराशाजनक बातमी समोर आली आहे. पोर्तुगाल आणि अल नासर फुटबॉलचा दिग्गज क्रिस्टियानो रोनाल्डो लवकरच फुटबॉलमधून निवृत्त होण्याच्या तयारीत आहे. ४० वर्षीय स्टार खेळाडूने सांगितले की त्याची गौरवशाली कारकीर्द संपुष्टात येणार आहे. तसेच त्याचे म्हणे आहे की, खेळाला निरोप देताना खूप भावनिक क्षण असणार आहे. रोनाल्डोने मुलाखतीमध्ये त्याच्या निवृत्ती आणि भविष्यातील योजनांबद्दल माहिती दिली.

क्रिस्टियानो रोनाल्डो म्हणाला की, ह्लवकरच, पण मी तयार होणार आहे. ते कठीण होईल, हो, मी रडू देखील शकतो. मी भावनिक व्यक्ती आहे. पण मी २५-२६ वर्षांच्या वयात माझ्या भविष्याची तयारी सुरू केली होत, म्हणून मला विश्वास आहे की मी ते हाताळू शकणार आहे.ह्लजगातील सर्वात यशस्वी खेळाडूंपैकी एक असणाऱ्या रोनाल्डोने आतापर्यंत त्याच्या कारकिर्दीत ९५२ गोल डागले आहेत. तो म्हणाला की तो फुटबॉलनंतरचे त्याचे आयुष्य त्याच्या कुटुंबासाठी आणि वैयक्तिक हितासाठी समर्पित करणार आहे. क्रिस्टियानो रोनाल्डो पुढे म्हणाला की, फुटबॉलमध्ये गोल करण्याच्या उत्साहासोबत काही देखील जोडता येत नाही. पण प्रत्येक गोष्टीची सुरुवात आणि शेवट हा असतोच. आता मला माझ्या कुटुंबासोबत आणि मुलांसोबत जास्त वेळ घालवायचा आहे. मला क्रिस्टियानो ज्युनियरसोबत राहायचे आहे कारण तो अशा वयात आहे जिथे मुले खूप चुका करत असतात. माटेओलाही फुटबॉल खूप आवडतो.ह्ल रोनाल्डो असे देखील उघड केले की त्याला आता त्याच्या मित्रांसोबत पॅडल खेळायला देखील आवडते. रोनाल्डोने २०२२ मध्ये युनायटेड सोडल्यानंतर, तो सौदी अरेबियाच्या क्लब अल नसरचा भाग झाला. तथापि, तो अजून देखील मँचेस्टर युनायटेडच्या निकालांवर लक्ष ठेवतो, कारण त्याचा माजी पोर्तुगीज संघमित्र रुबेन अमोरिम आता क्लबचा व्यवस्थापक आहे.



## दक्षिण आफ्रिकेचा पलटवार! पाकिस्तानला ८ विकेट्सने केले पराभूत

**लाहोर :** गुरुवारी पाकिस्तानविरुद्ध झालेल्या एकतर्फी सामन्यात दक्षिण आफ्रिकेने शानदार कामगिरी केली आणि ८ विकेट्सने सहज विजय मिळवला. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. पाकिस्तानने पहिला सामना २ विकेट्सने जिंकला होता. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ५० षटकांत ९ विकेट्स गमावून २६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, सलामीवीर क्विंटन डी कॉकच्या शतकी खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने ५९ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला.

पाकिस्तानकडून वसीम आणि फहीमने १-१ विकेट घेतल्या. कर्णधार शाहीन आफ्रिदीला कोणतेही यश मिळाले नाही. २७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेच्या संघाला डी कॉक आणि प्रिटोरियसने चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ७१ चेंडूत ८१ धावांची भागीदारी केली. ४० चेंडूत ४६ धावा काढून प्रिटोरियस बाद झाला. त्याने त्याच्या डावात सात चौकार आणि एक षटकार मारला. टोनी जॉर्जी ६३ चेंडूत ७६ धावा काढून बाद झाला. त्याने या डावात ९ चौकार आणि तीन षटकार मारले.

यष्टीरक्षक फलंदाज क्विंटन डी कॉकने ११९ चेंडूत ८ चौकार आणि सात षटकार मारून १२३ धावा केल्या. ब्रिट्झकेने २१ चेंडूत १७ धावांची खेळी केली. पाकिस्तानकडून फहीम अशरफने एक बळी घेतला आणि वसीम ज्युनियरने एक बळी घेतला. त्याआधी पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. संघाचा सलामीवीर फलंदाज फखर झमान खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये




परतला. माजी कर्णधार बाबर आझमही जास्त वेळ क्रीजवर राहू शकला नाही आणि ११ धावा काढून बाद झाला. यष्टीरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवानने ४ धावा केल्या. सॅम अयुब ६६ चेंडूत ५३ धावा काढून बाद झाला. तलत २० चेंडूत फक्त १० धावा करू शकला. सलमान आघा यांनी १०५ चेंडूत ६९ धावा केल्या.

फहीम अश्रफ यांनी १८ चेंडूत २८ धावा केल्या. कर्णधार शाहीन आफ्रिदी यांना फक्त एक धाव करता आली. मोहम्मद नवाज यांनी ५९ चेंडूत ५९ धावा केल्या. आफ्रिकेकडून नांद्रे बर्गर यांनी ४, पीटर यांनी ३ आणि बॉश यांनी २ बळी घेतले. त्याआधी, सॅम अयुब (५३), सलमान अली आगा (६९) आणि मोहम्मद नवाब (५९) यांच्या अर्धशतकांमुळे पाकिस्तानने सन्मानजनक धावसंख्या उभारली. बाबर (११) आणि रिझवान (४) शांत राहिले. दक्षिण आफ्रिकेकडून नांद्रे बर्गरने चार आणि पीटरसनने तीन बळी घेतले. दक्षिण आफ्रिकेने तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# प्रसिद्ध गायिका आणि अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांचे निधन





**मुंबई :** हिंदी चित्रपट आणि संगीताच्या चाहत्यांसाठी एक दु:खद बातमी आहे. प्रसिद्ध अभिनेत्री आणि गायिका सुलक्षणा पंडित यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झालं. मुंबईतील नानावटी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या. गेल्या १६ वर्षांपासून अंथरुणाला खिळून होत्या. त्यांच्या निधनाच्या बातमीने संपूर्ण चित्रपटसृष्टीत शोककळा पसरलीय.

सुलक्षणा पंडित यांनी ७० आणि ८० च्या दशकात त्यांच्या मधुर आवाजाने आणि इमोशनल अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं होतं. १९५४ मध्ये जन्मलेल्या सुलक्षणा पंडित एका प्रतिष्ठित संगीतकार कुटुंबातील होत्या. प्रख्यात शास्त्रीय गायक पंडित जसराज त्यांचे काका होते. त्यांचे भाऊ, जतिन आणि ललित यांनीही प्रसिद्ध संगीतकार जोडी म्हणून प्रसिद्धी मिळवलीय. त्यांनी वयाच्या ९ व्या वर्षापासून गायनला सुरुवात केली होती. १९६७ मध्ये त्यांनी पार्श्वगायनाच्या क्षेत्रात प्रवेश केला होता.

'संकल्प' (१९७५) चित्रपटातील 'तू ही सागर है तू ही किनारा' या गाण्यासाठी त्यांना फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट पार्श्वगायन पुरस्कार मिळाला होता. गायिका असण्यासोबतच सुलक्षणा पंडित यांनी अभिनयातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका साकारल्या. यात अभिनेता संजीव कुमार यांच्यासोबत 'उलझन' (१९७५) आणि 'संकोच' (१९७६) यांचा समावेश आहे.

सुलक्षणा पंडित यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य एकट्याने घालवले. संजीव कुमार यांच्यासोबतच्या अपूर्ण प्रेम कहाणीचा त्यांच्या आयुष्यावर खूप परिणाम झाला असे म्हटले जाते. कामापासून दूर राहिल्यानंतर त्यांना विविध आजार आणि आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागले.

# चिरंजीवीसोबत झळकणार मालविका






**मुंबई :** प्रभाससोबत 'द राजा साब' चित्रपटात दिसून येणारी दक्षिणेतील सुंदर अभिनेत्री मालविका मोहनन आता मेगास्टार चिरंजीवीसोबत मोठ्या पडद्यावर रोमान्स करताना दिसून येणार आहे. दिग्दर्शक बॉबी कोली यांचा पुढील चित्रपट 'मेगा १५८'मध्ये मेगास्टार चिरंजीवी मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटात दोन अभिनेत्रींची निवड करण्यात येणार असून यात मालविकाचे नाव ठरले आहे.

केरळची रहिवासी असलेली मालविका मोहनन ही प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर के. यू. मोहनन यांची कन्या आहे. तिने २०१३ मध्ये मल्याळी चित्रपट 'पट्टम पोल'द्वारे अभिनयाच्या कारकीर्दीची सुरुवात केली होती. यानंतर तिने तमिळ, हिंदी आणि मल्याळी चित्रपटात अनेक भूमिका साकारल्या आहेत. मास्टर (विजयसोबत), पेट्टा (रजनीकांत यांच्यासोबत), मारन (धनुषसोबत) आणि थंगालान (विक्रम सोबत) यासारख्या चित्रपटांमुळे तिने स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. आता तेलगू चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवत मालविका स्वत:ची नवी ओळख निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. चिरंजीवीसोबत काम करण्याची संधी मिळणे तिच्या कारकीर्दीचा टर्निंग पॉइंट ठरू शकते. मालविका याचबरोबर बॉलिवूडमध्ये स्थान निर्माण करू पाहत आहे.

# १२० बहादूर चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई :** '१२० बहादूर' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. यामध्ये मेजर शैतान सिंग भाटीच्या भूमिकेत फरहानचा अभिनय खरोखरच थक्क करणारा आहे.

१९६२ मध्ये हे स्पष्ट झाले की दोन्ही बाजूंनी बंधुत्वाची ही भावना अस्तित्वात नाही. विश्वासघातकी ड्रॅगनचा हल्ला हा विश्वासघात होता. मग तो दिवस आला जेव्हा स्वतंत्र भारतातील शूर सैनिकांनी चीनला दाखवून दिले की भारतीय रक्तात केवळ प्रेमच नाही, तर त्याच्या भूमिबद्दल आणि त्याहूनही अधिक, त्याच्या देशाबद्दल अभिमान आहे. फरहान अख्तरचा '१२० बहादूर' हा चित्रपट त्या शूर सैनिकांच्या धाडसाची आणि त्यागाची अशी कहाणी आहे की त्याचा २ मिनिटांचा ४८ सेकंदांचा ट्रेलर पाहून तुमचे हृदय अभिमानाने भरून येईल.

१२० बहादूर हा आपल्या शूर सैनिकांच्या धाडसाची, त्यागाची आणि निस्वार्थ देशभक्तीची कहाणी आहे. चित्रपटाचा ट्रेलर त्याच्या भव्यतेची झलक दाखवतो, हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की ट्रेलर भारतीय चित्रपटसृष्टीचा रॉकिंग स्टार आणि केजीएफ फेम यश यांनी सादर केला आहे. त्यांनी हा ट्रेलर एका भावनिक टीकेने लॉंच केला.

# केजीएफ फेम हरीश राय यांचे निधन



**मुंबई :** कन्नड फिल्म इंडस्ट्रीतील सुप्रसिद्ध अभिनेत्याचे निधन झाले. केजीएफ फेम अभिनेते हरीश राय यांचे आज निधन झाले. ६६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांना थायरॉईडचा कॅन्सर झाला होता. त्यांच्यावर बंगळुरू येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांची कॅन्सरसोबतची झुंज अपयशी ठरली. केजीएफ चित्रपटात त्यांनी रॉकीभाईच्या काकाची भूमिका साकारली होती. त्यांच्या निधनामुळे फिल्म इंडस्ट्रीवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत सिनेकलाकार आणि त्यांचे चाहते श्रद्धांजली देत आहेत.

हरीश राय यांना थायरॉईड कॅन्सर झाला होता. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. कॅन्सर त्यांच्या पोटापर्यंत पसरला होता आणि त्यांची प्रकृती खूपच खालावली होती. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान गुरुवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्राम वर पोस्ट करत अभिनेत्याला श्रद्धांजली दिली. त्यांच्या निधनामुळे फक्त कन्नड चित्रपटसृष्टीला नाही तर संपूर्ण दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीला धक्का बसला.

हरीश राय यांनी ३ दशकं सिनेसृष्टीत काम केले. त्यांनी कन्नड चित्रपटसृष्टीमध्ये स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली होती. आपल्या दमदार भूमकांसाठी ते ओळखले जात होते. त्यांनी १९९० च्या दशकातील सुपरहिट चित्रपट 'ओम'मध्ये डॉन रॉयची भूमिका केली होती. या भूमिकेमुळे त्यांना घराघरात लोकप्रियता मिळाली. त्यानंतर त्यांनी तमिळ आणि कन्नड अशा अनेक चित्रपटांमध्ये विविध भूमिका करून स्वत:ची ओळख निर्माण केली होती. खलनायकाची भूमिका असो किंवा भावनिक पिता-पुत्राची भूमिका अशा सगळ्या भूमिका साकारत ते प्रेक्षकांचे मन जिंकत होते. राय यांनी फक्त कन्नड चित्रपटांमध्येच नाही तर तमिळ आणि तेलगू चित्रपटांमध्येही काम केले. त्यांच्या प्रत्येक भूमिका कायम सर्वांच्या लक्षात राहण्यासारख्या आहेत.

# पवन सिंहच्या पत्नीने मागितली मदत, शेअर केला क्यूआर कोड




**पटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी मतदान सुरू झाले आहे. यावेळी अनेक भोजपुरी स्टार निवडणूक लढवत आहेत. यावेळी भोजपुरी पॉवरस्टार पवन सिंह यांच्या पत्नी ज्योती सिंह देखील निवडणूक लढवत आहे. ज्योती बिहारमधील करकट विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार आहे.

ज्योती आपला जोरदार प्रचार करत आहे. घरोघरी जाऊन तिला मतदान करण्यासाठी आवाहन करत आहेत. अपक्ष निवडणूक लढवत असलेल्या ज्योतीला अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे तिने इंस्टाग्रामवर आर्थिक मदत करण्याची विनंती केली आहे. क्यूआर कोड शेअर करत ज्योतीने लिहिले, 'राम आणि कृष्णासारख्या अवतारांनाही समाजाकडून खूप काही सहन करावे लागले. त्यांच्यासमोर मी तर एक तुच्छ महिला आहे. अनेक अत्याचार सहन करूनही काही जण माझ्यावर आरोप करतात. काही लोकांना माझ्या अश्रूंमध्ये फसवणूक आणि ढोंग दिसते. पण माझ्यासारख्या लाखो पीडितांच्या आवाजाला बळ देण्यासाठी, मी करकट विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहे.' ज्योती सिंहने पुढे लिहिले, 'मला जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे. कृपया या निवडणूक मोहिमेला आणखी बळ देण्यासाठी मदत करा आणि खालील क्यूआर कोडवर देणगी पाठवा. मी मोठ्या आशेने तुमच्या दाराशी हात जोडून उभी आहे. गेल्या निवडणुकीपासून आजपर्यंत, मी करकट सोडले नाही आणि मी नेहमीच तुमच्या सुख-दु:खात सहभागी असते. आज, तुमची ही मुलगी तुमच्याकडे मदत मागते आहे.' यापूर्वीही, दिवाळीच्या काळात, ज्योती सिंहने जनतेकडून आर्थिक मदत मागणारी एक पोस्ट शेअर केली होती, परंतु नंतर ती डिलीट केली.

# १० वर्षांच्या विश्रांतीनंतर इमरान खानचा कमबॅक



**मुंबई :** इम्रान खान हा एकेकाळी बॉलिवूडमधील सर्वात मोठ्या स्टारपैकी एक मानला जात असे. पण त्याने अचानक अभिनय सोडून दिला आणि इंडस्ट्रीपासून दूर गेला. चाहते त्याच्या पुनरागमनाची बऱ्याच काळापासून वाट पाहत होते. या वर्षाच्या सुरुवातीला त्याच्या पुनरागमनाची बातमी आली, ज्यामुळे आणखी प्रतीक्षा करावी लागली. इम्रानने २००८ मध्ये जाने तू या जाने ना या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. जेनेलिया डिसूझासोबतची त्याची केमिस्ट्री प्रेक्षकांना चांगलीच आवडली. चित्रपटातील उत्साही आणि रोमँटिक संगीत अजूनही प्रेक्षकांना आठवते. इम्रान खान अचानक गायब होण्यापूर्वी सात वर्षे इंडस्ट्रीमध्ये सक्रिय होता. या काळात, त्याने अनेक प्रमुख अभिनेत्रींसोबत स्क्रीन शेअर केली.

इम्रानचा जवळचा मित्र, अभिनेता अक्षय ओबेरॉय यानेही एका मुलाखतीत खुलासा केला की इम्रान खानने अधिकृतपणे अभिनय सोडला आहे. या बातमीने इम्रान खानच्या चाहत्यांना खूप दु:ख झाले. चाहते त्याला पुन्हा पडद्यावर पाहण्यासाठी उत्सुक होते. आता, इम्रान खानच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. अभिनेता लवकरच मोठ्या पडद्यावर परतणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ११ नगरपरिषदांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## मतदारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजवावा

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलडाणा

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्य व अध्यक्ष पदांसाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील एकूण ११ नगरपरिषद त्यापैकी ७ ब वर्ग व ४ क वर्ग नगरपरिषेमध्ये निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. ही निवडणूक चांगल्या व उत्कृष्ट पध्दतीने पार पाडण्यासाठी आचारसंहितेचे पालन करावे तसेच मतदारांनी कोणत्याही प्रलोभन व दबावाला बळी न पडता आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूकीच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख दि. ६ नोव्हेंबर २०२५. राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर नामनिर्देशपत्र भरण्यासाठी उपलब्ध असण्याचा कालावधी १० ते १७ नोव्हेंबर २०२५ दुपारी ३ वाजेपर्यंत राहणार आहे. रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक १८ नोव्हेंबर २०२५, अपिल नसल्यास नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा कालावधी दिनांक १९ ते २१ नोव्हेंबर २०२५ असा राहणार आहे. अपील असल्यास दि. २१ ते २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करतील. दिनांक २६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्ह नेमून देणे तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. मतदानाचा दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी असून मतदाररांना मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक ३ डिसेंबर रोजी मतमोजणी आणि निकाल जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर १० डिसेंबरपूर्वी शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करण्यात येईल. जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांच्या सार्वत्रित निवडणूकीत २ लाख ४२ हजार १०८ पुरुष आणि २ लाख ३४ हजार ७२६ स्त्रीया आणि २१ इतर असे एकूण ४ लाख ७६ हजार ८५५ मतदार आहेत. या निवडणूकीत एकूण १४१ प्रभाग संख्या राहणार असून त्यातून २८६ सदस्य निवडले जाणार आहे. त्यापैकी १४५ सदस्य पदाच्या जागा स्त्रियांसाठी राखीव करण्यात आल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकातील उमेदवारांना नामनिर्दे शनपत्र व शपथपत्र दाखल करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने ://. हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करुन नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणूकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार आहे. एका नोंदणीव्दारे संबंधित प्रभागात एका उमेदवारास चार नामनिर्देशनपत्रे दाखल करता येऊ शकणार आहे. संकेतस्थळावर संपूर्ण नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरल्यानंतर त्याची मुद्रित प्रत काढून त्यावर स्वाक्षरी करुन ती प्रत विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे आवश्यक राहणार आहे. नामनिर्देशनपत्र संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात स्विकारले जाणार आहे.

# इन्स्टाग्रामवरून आमिष दाखवून युवकाची ५० हजारांनी फसवणूक





जनसंचलन/मलकापूर

इन्स्टाग्रामवर ओळख वाढवून एक लाखाचे पाच लाख रुपये देऊन पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवत, मध्य प्रदेशातील युवकाला मलकापूर येथे बोलावून त्याची ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी आरोपींविरुद्ध चार गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिघांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी अजितसिंग बलदेवशरणसिंग करोरिया (२४, रा. ग्वाल्हेर, मध्य प्रदेश) यांनी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, फिर्यादी इन्स्टाग्रामवर रिल्स पाहत असताना एका मोबाइल क्रमांकावरून व्यक्तीशी संपर्कात आला. त्याने एक लाख रुपये दिल्यास पाच लाख रुपये परत मिळतील असे सांगून फिर्यादीला ग्वाल्हेरहून मलकापूर येथे बोलावले. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० आल्यानंतर क्रमांकावरून त्याला बसस्थानकासमोर माता महाकाली कमान येथे थांबण्यास सांगितले. ते १०:२५ या वेळेत फिर्यादी मलकापुरात दुसऱ्या मोबाइल त्यानंतर आरोपीने ऑटो चालक सुरेंद्रसिंग राजूसिंग राजपूत व सागर तायडे (रा. मलकापूर) यांच्या मदतीने फिर्यादीकडून ५०,००० रुपये घेतले. तसेच लूटमार करण्याचाही प्रयत्न केल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. या प्रकरणी शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७२६/२०२५, कलम ३१८ (४), ६२, ३ (५) नुसार चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक दीपक वारे करीत आहेत. ऑनलाईन फसवणुकीचे प्रमाण आता वाढले आहे.

# देऊळगाव राजामध्ये तलवारीने केक कापून वाढदिवस साजरा; सात जणांवर गुन्हा दाखल!

जनसंचलन/ देऊळगाव राजा




देऊळगाव राजा वाढदिवस साजरा करण्यासाठी काही युवकांनी शहरातील मुख्य रस्त्यावर रात्री उशिरा तलवारीसारखी घातक शस्त्रे घेऊन केक कापल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सात जणांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी पाच जणांना अटक करण्यात आली आहे. ही घटना ४ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. देऊळगाव राजा-जालना रोडवरील मिस्त्री कोटकर पेट्रोल पंपासमोर काही युवकांनी बेकायदेशीरपणे जमाव जमवून सार्वजनिक ठिकाणी वाढदिवस साजरा केला. या दरम्यान त्यांनी तलवारीसारख्या शस्त्रांचा वापर करून केक कापला. ज्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणी मिलन राजेश नाडे (रा. पिंपळनेर), उमेश सतीश अंभोरे (रा. पिंपळनेर), आयान खान जहीर खान (रा. कबाडपुरा), कार्तिक निंबाजी हिवाळे, शुभम लिंबाजी हिवाळे (रा. माळीपुरा), चंदू साळवे (रा. पिंपळनेर) आणि विशाल एकनाथ तिडके (रा. साईनगर, देऊळगाव राजा) या सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी पाच जणांना अटक करण्यात आली आहे

# जिल्हाधिकाऱ्यांची राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक

जनसंचलन/बुलढाणा



राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्र जाहीर केला असून त्याअनुषंगाने जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना माहिती देण्यासाठी आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी त्यांच्या कार्यालयात बैठक घेतली. या बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुहासिनी गोणेवार, मुख्य वित्त व लेखाधिकारी प्रकाश राठोड, जिल्हा सह आयुक्त पेंटे व भाजप, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, रिपाई, राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प.), शिवसेना (उ.बा.ठा.), महाराष्ट्र नवनिर्माण सेना आदी पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यावेळी निवडणूक कार्यक्रमाची माहिती देवून निवडणुक प्रक्रियेची ही संपूर्ण माहिती संभाव्य उमेदवार व नागरिकांपर्यंत पोहचवावी. मतदार याद्या, निवडणूक आयोगांचे आदेश, सूचनाबाबतची माहितीपुस्तिका जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर आणि राज्य निवडणुक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच नियमांचे पालन करुन निवडणुक प्रक्रिया पार पाडावी, असे आवाहन त्यांनी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना केले.

# शिंगणे साहेब, तुम्ही कुठे चुकता आहात का? कार्यकर्त्यांची उघड नाराजी विश्वासूंचाच अजितदादांच्या गटाकडे मोर्चा!

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यात राजकारणाचे तापमान चढले असून, डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्यासाठी हा धक्का कमी गंभीर नाही. त्यांच्या अगदी जवळचे, नगराध्यक्षपदासाठी सर्वात प्रबळ दावेदार मानले जाणारे श्याम मेहेत्रे यांनी राष्ट्रवादी (शरद पवार गट) ला रामराम ठोकत थेट अजित पवार गटाची वाट धरली आहे. कार्यकर्त्यांतुन उमटणारी नाराजी आणि नेतृत्वावरचा संशय आता स्पष्टपणे शिंगणे गटाला हादरवू लागला आहे. विधानसभा निवडणुकीतच मतदारांनी स्पष्ट संदेश दिला. सत्ता कुणाच्या घरची नाही! मनोज कायंदे यांनी सुरुवातीला तिसऱ्या क्रमांकावरून झेप घेत विजय मिळवत शिंगणे यांना नामुष्कीजनक पराभव चाखवला. या विजयामागे राष्ट्रवादी (अजितदादा) गटाचे जिल्हाध्यक्ष नाझेर काझी यांची रणनीती ठळकपणे दिसून आली.याच दरम्यान, शिंगणे गटातील प्रमुख चेहरे हळूहळू हातातून निसटू लागले हे अधिक चिंताजनक आहे. आज श्याम मेहेत्रेंच्या या निर्णयाने प्रश्न उपस्थित झाला.शिंगणे साहेब, कार्यकर्त्यांचा विश्वास का ढळतोय? मतदारसंघातील लोकप्रतिनिधींपासून साध्या कार्यकर्त्यांपर्यंत असंतोषाचे वारे वाहताना दिसतात. गटबाजी, निर्णयांतील ढवळाढवळ आणि नेतृत्वातील निष्क्रियता ही कारणं सांगितली जात आहेत. येणाऱ्या नगर परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या



रणधुमाळीत ही गळती अशीच सुरू राहिली, तर शिंगणे गटासमोर राजकीय अस्तित्व टिकविण्याचं आव्हान निर्माण होईल, यात शंका नाही. कार्यकर्त्यांचा विश्वास परत मिळवला नाही, तर भावी अध्यक्षपद तर दूरच, गडही हातातून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

## युवकाचा विहिरीत मृतदेह आढळला!

**जनसंचलन/बुलढाणा**

चिखली तालुक्यातील अमडापूर परिसरात एका २५ वर्षीय युवकाचा मृतदेह शेतातील विहिरीत आढळून आला आहे. मृताचे नाव प्रशांत रमेश शिंदे (रा. वरखेड, ता. जाफ्राबाद) असे असून, तो ४ नोव्हेंबरच्या रात्रीपासून बेपत्ता होता. मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत शिंदे हा आपल्या मित्रासह रात्री मक्याच्या शेतीची रखवाली करण्यासाठी गेला होता. रात्री एकच्या सुमारास त्याचा मित्र झोपलेला असताना प्रशांत दिसेनासा झाला. सकाळी शोध घेतल्यावर जवळच्या विहिरीत त्याचा मृतदेह आढळला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह बाहेर काढला.




## शेतरस्ता खुला करण्यासाठी शेतकऱ्याचे उपोषण सुरू...

### हिवरा आश्रम परिसरातील गणेश काळेंचे उपोषण...

**जनसंचलन/ हिवरा आश्रम**

पिंपळगाव उंडा येथील शेतकरी गणेश गजानन काळे यांनी आपल्या शेतात जाण्यासाठी असलेला शिवरस्ता मोकळा करण्याच्या मागणीसाठी अन्नत्याग उपोषणास सुरुवात केली आहे. संबंधित रस्ता खुला न झाल्याने गेल्या काही महिन्यांपासून त्यांना शेतीकामात अडचणी येत आहेत. गणेश काळे यांची गट क्रमांक २४५ मधील १ हेक्टर ६२ आर जमीन मालकीची असून, त्या शेतात जाण्यासाठी असलेला रस्ता अडथळ्यामुळे बंद आहे. याबाबत त्यांनी प्रशासनाकडे अनेक वेळा अर्ज केले. २१ ऑगस्ट रोजीही त्यांनी लेखी मागणी केली होती. त्यानंतर ३ सप्टेंबर रोजी तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी

६ नोव्हेंबर पासून सुरू केले आहे उपोषण उपोषणाला बसलेले गणेश काळे व सहकारी.



जागेची पाहणी करून अहवाल तयार केला आणि ८ सप्टेंबर रोजी सीमांकन करणे आवश्यक असल्याचे पत्र व्यवहारात नमूद केले. तथापि, त्या आजपर्यंत पाहणीनंतरही कोणतीही कारवाई न झाल्याने गणेश काळे यांनी ६ नोव्हेंबरपासून शेताच्या रस्त्यातच अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. त्यांनी प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप करत सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणींकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे. रस्ता खुला न केल्यास त्याची जबाबदारी अधिकाऱ्यांवर राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. गणेश काळे यांच्या या उपोषणामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण असून, प्रशासनाने तातडीने लक्ष घालून तोडगा काढावा, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. काळेंच्या उपोषणाला पाठिंबा मिळत आहे.